# ‘विवेकानंद’मधील आविष्कार संशोधन स्पर्धेत ६५ प्रकल्पांचे सादरीकरण

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये सर्व शाखांतील विद्यार्थ्यांसाठी आविष्कार संशोधन स्पर्धा उत्साहात पार पडली. कला, वाणिज्य, विज्ञान तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांचे ६५ संशोधन प्रकल्पांवर आधारित पोस्टर्स, मॉडेलचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. विज्ञान, कला, इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, शेती व पशुपालन, वाणिज्य, औषध निर्माणशास्त्र या विविध सहा स्पर्धा प्रकारांतून प्रत्येकी तीन विजेते निवडण्यात आले. १८ पैकी १२ विजेत्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवडण्यात आले. स्पर्धेचे नियोजन आविष्कार समन्वयक प्रा. डॉ. सुमैया इनामदार, डॉ. शुभांगी काळे, प्रा. सोमनाथ काळे, प्रा. एस. जी. कुलकर्णी, प्रा. आर. आर. माने, डॉ. सुनील भोसले यांनी केले.

तरुण भारत संवाद

सोमवार, ६ नोव्हेंबर २०२३

# विवेकानंदच्या बारा विद्यार्थ्यांची विद्यापीठ अविष्कारसाठी निवड

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये सर्व शाखातील विद्यार्थ्यांसाठी अविष्कार संशोधन स्पर्धा उत्साहात पार पडली. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. स्पर्धेसाठी सर्व शाखांमधून ६५ संशोधन प्रकल्पावर आधारित पोस्टर्स, मॉडेलचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. विज्ञान, कला, इंजिनिअरींग अँण्ड टेक्नॉलॉजी, शेती व पशुपालन, वाणिज्य, औषधनिर्माण शास्त्र या स्पर्धांमधून प्रत्येकी तीन विजेते जाहीर केले. १२ विजेत्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित जिल्हा स्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी निवड केली. स्पर्धेचे नियोजन अविष्कार समन्व्यक डॉ. सुमैया इनामदार, डॉ. शुभांगी काळे, प्रा. सोमनाथ काळे, प्रा. एस. जी. कुलकर्णी, प्रा. आर. आर. माने, डॉ. सुनिल भोसले यांनी केले.

पुढारी
MY कोल्हापूर

Moday 6th Nov. 2023

## संक्षिप्त

### 'विवेकानंद'मधील आविष्कार संशोधन स्पर्धेत ६५ प्रकल्पांचे सादरीकरण

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमध्ये सर्व शाखांतील विद्यार्थ्यांसाठी आविष्कार संशोधन स्पर्धा उत्साहात पार पडली. कला, वाणिज्य, विज्ञान तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांचे ६५ संशोधन प्रकल्पांवर आधारित पोस्टर्स, मॉडेलचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. स्पर्धेचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या हस्ते झाले. विज्ञान, कला, इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी, शेती व पशुपालन, वाणिज्य, औषध निर्माणशास्त्र या विविध सहा स्पर्धा प्रकारांतून प्रत्येकी तीन विजेते निवडण्यात आले. १८ पैकी १२ विजेत्यांना शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवडण्यात आले. स्पर्धेचे नियोजन आविष्कार समन्वयक प्रा. डॉ. सुमैया इनामदार, डॉ. शुभांगी काळे, प्रा. सोमनाथ काळे, प्रा. एस. जी. कुलकर्णी, प्रा. आर. आर. माने, डॉ. सुनील भोसले यांनी केले.

6/11/2023

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, ६ नोव्हेंबर २०२३

# श्रेया बराले, सृष्टी कुलकर्णी यांची विद्यापीठ संघात निवड

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सृष्टी कुलकर्णीची राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धा, तर श्रेया बरालेची आंतरविभागीय तायक्वाँदो स्पर्धेतून राज्यस्तरीय विद्यापीठ संघात निवड झाली.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी त्यांचे अभिनंदन केले. खेळाडूंना जिमखानाप्रमुख प्रा. हवलदार, एन. आर. सणगर, प्रा. सहिदा कच्छी, प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रशिक्षक विश्वास बराले यांचे मार्गदर्शन लाभले.